आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२३ फेब्रुवारी २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणाने प्रारंभ

- दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात शोकप्रस्ताव सादर

- स्वतंत्र भारताचे गव्हर्नर जनरल सी राजगोपालाचारी यांच्या पुतळ्याचं राष्ट्रपतींच्या हस्ते अनावरण/ राजाजी उत्सवाचं उद्घाटन

- सोन्याच्या दरवाढीकडे केंद्र सरकारचं बारकाईनं लक्ष असल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत झिंबाब्वे विरुद्ध वेस्ट इंडीज हा सामना आज मुंबईच्या वानखेडे स्टेडीयमवर रंगणार

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आज राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणानं सुरुवात झाली. यावेळी राज्यपालांनी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राज्य सरकारच्या कामगिरीचा आढावा मांडला. स्थूल राष्ट्रीय उत्पादनात महाराष्ट्राचं योगदान साडेतेरा टक्के असून देशात सर्वात जास्त विदेशी गुंतवणूक आकर्षित करणारं राज्यही महाराष्ट्रच आहे, असं राज्यपाल म्हणाले. २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीत ९१ हजार ३२७ कोटींची गुंतवणूक राज्यात आली, त्यामुळे महाराष्ट्र हे उद्योगधंद्यात अग्रगण्य राज्य असल्याचं त्यांनी नमूद केलं. गेल्या महिन्यात दावोस इथं झालेल्या जागतिक परिषदेत राज्य सरकारनं विविध देशांमधल्या १८ कंपन्यांसोबत तीस लाख कोटी रुपयांचे करार केले, यामुळे ४० लाख रोजगार निर्माण होणार आहेत, असं राज्यपालांनी सांगितलं. उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारनं आखलेल्या विविध धोरणांची माहिती यावेळी राज्यपालांनी दिली.

**- - होल्ड- बाईट राज्यपाल - -**

राज्यातल्या कृषी क्षेत्राच्या विकासालाही सरकारनं प्राधान्य दिलं आहे, त्यासाठी मागेल त्याला सौरपंप, मोफत वीज आदी योजना राबवल्या जात आहेत, असं राज्यपाल म्हणाले. महिला, आदिवासी, मागास समूहाच्या प्रगतीसाठी सरकार वचनबद्ध असल्याचं सांगत, या सर्व घटकांसाठी सरकार राबवत असलेल्या धोरणांची माहिती राज्यपालांनी दिली.

**त्यानंतर** विधानसभेचं कामकाज सुरू झालं तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला. अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडणं हा आपल्यासाठी भावनिक क्षण आहे, त्यांच्यासारख्या सहकाऱ्याचं निधन होणं ही केवळ राजकीय हानी नाही तर व्यक्तिशः प्रचंड वेदनादायक बाब आहे, अशी भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी अजित पवार यांच्याविषयीच्या अनेक आठवणी जागवल्या. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनीही यावेळी आपलं मनोगत व्यक्त केलं. अजित पवार हे कार्यक्षम आणि स्पष्टवक्ते नेते होते असं जाधव म्हणाले. त्यांनी नेहमी संसदीय परंपरेचं पालन केलं तसंच विरोधी पक्षांच्या नेत्यांचाही आदर केला असंही त्यांनी सांगितलं. मंत्री छगन भुजबळ, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, गुलाबराव पाटील, दिलीप वळसे पाटील यांनीही शोकप्रस्तावावर चर्चेत भाग घेतला.

त्याआधी मुख्यमंत्र्यांनी उपमुख्यमंत्री तथा राज्य उत्पादन शुल्क मंत्री सुनेत्रा पवार यांची सभागृहाला ओळख करून दिली.

**विधानपरिषदेत** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला. यावेळी शिंदे यांनी अजित पवार यांच्या कार्याचा गुणगौरव केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस नेते सतेज पाटील, शशिकांत शिंदे, प्रवीण दरेकर, विक्रम काळे यांनीही अजित पवार यांच्याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या.

**<><><><><>**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशी करण्याच्या सूचना देण्याची विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना केली आहे. मुंबईत वार्ताहर परिषदेत फडनवीस यांनी ही माहिती दिली. या अपघाताविषयी असलेल्या सर्व शंका दूर करण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या संदर्भात महायुतीतला मित्र पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसकडून या अपघाताची

सीबीआय चौकशी करण्याची मागणी करणारं पत्र मिळाल्याचं सांगून या संदर्भात केंद्रीय गृह मंत्र्यांशी चर्चा झाल्याचे ते म्हणाले.

या चौकशीची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनीही मांडली आहे.

**- - - होल्ड - बाईट- रोहित पवार - - -**

**- <><><><><>**

संत गाडगेबाबा यांच्या जयंतिनिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज लोकभवन इथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. यावेळी लोकभवनातले अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

**<><><><><>**

स्वतंत्र भारताचे पहिले आणि एकमेव गव्हर्नर जनरल चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्या अर्धपुतळ्याचं अनावरण आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात  झालं. अशोक मंडपाजवळच्या ग्रँड ओपन स्टेअरकेस भागात असलेल्या एडविन लुटियन्स यांच्या अर्धपुतळ्याच्या जागी आता राजगोपालाचारी यांचा पुतळा स्थानापन्न झाला आहे. राष्ट्रपती भवन या नावानं ओळखली जाणारी वास्तू हे राजाजींचं शासकीय निवासस्थान होतं. राजाजींच्या व्यक्तिमत्व आणि कार्यानं भारताच्या जडणघडणीवर अमीट ठसा उमटवला आहे, असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

या अनावरण सोहळ्याला उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा, डॉ. एस. जयशंकर, धर्मेंद्र प्रधान, गजेंद्र सिंह शेखावत, डॉ. एल. मुरुगन आणि चक्रवर्ती राजगोपालाचारी यांचे कुटुंबीय उपस्थित होते. राष्ट्रपती भवनात आजपासून राजाजी उत्सवाचं आयोजन करण्यात आलं असून हा उत्सव येत्या १ मार्चपर्यंत सुरू राहील.

**<><><><><>**

सोन्याचांदीच्या दरांवर सरकारचं बारकाईने लक्ष असल्याची ग्वाही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली आहे. सणासुदीला किंवा लग्नसराईच्या दिवसात सोन्याचे दर वाढतात, पण त्यात चिंताजनक बदल झालेले नाहीत, असं त्या म्हणाल्या. केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर झाल्यानंतरच्या वार्ताहर परिषदेत रिझर्व बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा

यांच्यासह त्या बोलत होत्या. भारताच्या विकासयात्रेत सहभागी व्हावं, असं आवाहन सीतारामन यांनी संस्थात्मक गुंतवणूकदारांना केलं .

चालू खात्यातली तूट आवाक्यात असल्याचं रिझर्व बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितलं. सध्या देशात भांडवल टंचाई नाही, असं ते एका प्रश्नाच्या उत्तरात म्हणाले.

**- - होल्ड – बाईट- गव्हर्नर - - -**

**<><><><><>**

अमरावती जिल्ह्यातल्या धारणी तालुक्यात काल रात्री झालेल्या अपघातात चौघांचा मृत्यू झाला असून सातजण गंभीर जखमी झाले. मध्यप्रदेश सीमेलगतच्या देडतलाई इथल्या आठवडी बाजारातून परतणारी पिकअप व्हॅन दरीत कोसळून हा अपघात झाला. जखमींवर उप-जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून गंभीर जखमींना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवलं आहे.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज झिंबाब्वे विरुद्ध वेस्ट इंडीज हा सामना मुंबईतच्या वानखेडे स्टेडीयमवर होणार आहे. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल.

गुण तालिकेत आता दक्षिण आफ्रिका, इंग्लंड प्रत्येकी दोन गुण मिळवून पुढे आहेत. न्यूझीलंड आणि पाकिस्तानला प्रत्येकी एक गुण मिळाला आहे.

**//<><><><><>//**